CIDCO
WE MAKE CITIES
प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
सिडको
शहरांचे शिल्पकार

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ratambepriya@gmail.com

**दि. १५.०१.२०२१**

**सिडकोच्या घणसोली आणि नवीन पनवेल येथील निवासी, रो हाउस, बंगलो भूखंडांच्या विक्रीस उत्तम प्रतिसाद**
**सिडकोच्या तिजोरीत ५६ कोटींची भर**

सिडको महामंडळातर्फे ई-लिलाव व ई-निविदा प्रक्रियेद्वारे घणसोली आणि नवीन पनवेल येथील एकूण २७ निवासी, रो हाउस, बंगलो भूखंडांच्या विक्री च्या योजनेस निविदाकारांचा उत्तम प्रतिसाद लाभून योजना पुस्तिकेतील वेळापत्रकानुसार संपूर्ण प्रक्रिया पार पडून १५ जानेवारी २०२१ रोजी सिडको भवन येथे प्राप्त झालेल्या ई-निविदा उघडण्यात आल्या व ई-लिलाव प्रक्रियेमधील बोलींची तुलना करण्यात येऊन यशस्वी निविदादारांची नावे जाहीर करण्यात आली आहेत. या भूखंड विक्रीतून सिडकोच्या तिजोरीत अंदाजे रू. ५६ कोटींची भर पडली आहे.

सदर योजने अंतर्गत सिडको महामंडळातर्फे डिसेंबर २०२० मध्ये नवी मुंबईतील विकसित नोड असलेल्या घणसोली येथील सेक्टर-४ मधील एकूण १२ भूखंड तर झपाट्याने विकसित होत असलेल्या नवीन पनवेल (पू.) नोड येथील सेक्टर-८ई, ९ई, ५ए(ई) आणि १२ई मधील एकूण १५ भूखंड विक्रीकरिता उपलब्ध करून देण्यात आले होते. सदर भूखंड हे निवासी, रो हाउस, बंगलो वापराकरिता उपलब्ध होते. सर्व भूखंडांकरिता १.०० इतका चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय आहे. ई-लिलाव व ई-निविदा प्रक्रिये अंतर्गत अर्ज नोंदणी, अनामत रकमेचा भरणा, निविदा भरणे या सर्व प्रक्रिया सुलभ, पारदर्शक व जलद अशा ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात आल्या. यामध्ये ऑनलाईन माध्यमातून बंद निविदा सादर केल्यानंतर अर्जदरांना पुढील टप्प्यातील ई-लिलाव प्रक्रियेमध्ये सहभागी होता येणार होते.

बंद निविदेमध्ये उद्धृत करण्यात आलेली बोली किंवा ई-लिलावामध्ये उद्धृत करण्यात आलेली बोली यांपैकी जी बोली जास्त रकमेची असेल ती बोली स्वीकारण्याचा निकष निश्चित करण्यात आला होता.

**“या भूखंड विक्री योजनांच्या माध्यमातून नवीन वर्षाच्या सुरूवातीलाच सर्वसामान्य नागरीक व विकासकांना आपली स्वप्नं साकार करण्याची सुवर्णसंधी प्राप्त झाली आहे. भविष्यातदेखील अशा अनेक सुवर्णसंधी सिडकोतर्फे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत, असे प्रतिपादन सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी यांनी केले आहे.”**

---

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

जनसंपर्क विभाग, सिडको